# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषद कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि. १८ जून, २०१० दुपारी १२:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा शुक्रवार दि.१८/०६/२०१० रोजी दुपारी १२:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बाबासाहेब पांडुरंग बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. अनिल नागनाथ बारबोले | सदस्य |
| ३) | ॲड. रामदास पापय्या सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. लालासाहेब पतंगराव देशमुख | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिरा कोळेकर | सदस्य |
| ७) | डॉ. प्रकाश गोविंद मोरे | सदस्य |
| ८) | श्री. निवृत्ती बाबूराव पवार | सदस्य |
| ९) | श्रीमती नंदा विवेक साठे | सदस्या |
| १०) | श्री. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य |
| ११) | श्री. नामदेव राजाराम गरड | सदस्य |
| १२) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १३) | कॅप्टन डॉ. नितीन पांडुरंग सोनजे | सचिव |

**अनुपस्थिती :**

श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे, मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे प्रतिनिधी मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे, याची मा. अध्यक्षांनी नोंद घेऊन अनुपस्थितीस परवानगी देण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली. प्राचार्य जयप्रकाश कोंडीबा बिले, प्रा. पंचय्या महंतय्या हिरेमठ यांचा सेवानिवृत्तीनिमित्त पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला तसेच प्राचार्य डॉ. हनुमंत नारायण जगताप यांनी सदर सत्कारास उपस्थित राहू न शकल्याबाबत कळविल्याची नोंद घेण्यात आली.

ॲड. रामदास पापय्या सब्बन यांनी मा.कुलपती कार्यालयास मा. मुख्यमंत्री व कुलगुरुनिवडीसंदर्भात मौलिक कायदेशीर सल्ला दिला यास्तव मा.कुलपती कार्यालयाने त्यांचा गौरव केल्याबद्दल व्यवस्थापन परिषदेच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र.१ दि.३० मार्च, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१** | **दि.३० मार्च, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यालयीन कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.३** | **स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेचे ए.टी.एम. (ATM) विद्यापीठ परिसरात सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(टिपणी: स्टेट बँक ऑफ इंडिया दि.०६/११/२००९ रोजी सर्व सुविधा असणारी शाखा सुरु करण्यास मान्यता मागितली होती. त्यानुसार विद्यापीठाने दि.२१/११/२००९ रोजी विषय क्र. १४ स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेसमवेत विद्यापीठ परिसरात सर्वसुविधा असणारी शाखा सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवली त्यावर कार्यवाही ठराव क्र. १४ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेसमवेत विद्यापीठ परिसरात सर्वसुविधा असणारी शाखा सुरु करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे पत्र दि.२९/०१/२०१० अन्वये या विद्यापीठात स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरु करण्याचा प्रस्ताव सध्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या कार्यालयात प्रलंबित असून सदर बँकेने मान्यता दिल्यानंतरच विद्यापीठ परिसरात स्टेट बँक ऑफ इंडियांची शाखा सुरु करण्यात येईल असे कळविले आहे.

तूर्तास विद्यापीठ प्रांगणात स्टेट बँक ऑफ इंडियाची ए.टी.एम. (ATM) सुरु करण्यास उत्सुक आहेत असे कळविले आहे. तरी ए.टी.एम. (ATM) सुविधा सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३** | **स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेचे ए. टी. एम. (A.T.M.) विद्यापीठ परिसरात सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |

**विषय क्र.४ देणगीदाराच्या ठेवीतील रकमेच्या व्याजातून बक्षीस देण्याबाबत प्राचार्य डॉ. एच. जी. कुलकर्णी यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत मा. प्राचार्य डॉ.एच. जी. कुलकर्णी यांचे पत्र जोडले आहे)

(टिपणीः विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीतील रकमेच्या व्याजातून बक्षीस देण्याबाबतचा शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कडील Proposed Amendment to Statute 544 (S544) नुसार बदल करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१० मार्च, २०१० रोजी झालेल्या सभेत विषय क्र. १८(२) अन्वये सादर केला असता, त्यावरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

**विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीची अनामत रक्कम कमीत कमी रु.५०,०००/- असावी. सदरच्या रकमेची विगतवारी १०% Endowment Fund, २५% Corpus Fund व उर्वरित ६५% बक्षीस रुपाने वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली.**

उक्त ठरावानुसार, देणगीदाराच्या ठेवीची अनामत रक्कम कमीत कमी रु.५०,०००/- असावी व ठेवीच्या व्याजातून येणाऱ्या रकमेची विगतवारी १०%, Endowment Fund २५%, Corpus Fund ६५% व उर्वरीत ६५% रक्कम बक्षीस स्वरुपाने वितरीत करण्यात येईल असे मा. प्राचार्य डॉ. एच. जी. कुलकर्णी यांना कार्यालयाच्या दि.२६/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

यासंदर्भात प्राचार्य डॉ. एच. जी. कुलकर्णी यांचे खास बाब म्हणून दोन बक्षिसासाठी रु.२५,०००/- स्विकारण्याबाबत प्राप्त झालेले पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| ठराव क्र.४ | **प्राचार्य डॉ. एच. जी. कुलकर्णी यांच्या दि.२९/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये केलेली विनंती अमान्य करण्यात येवून दि.१० मार्च, २०१० रोजीच्या सभेतील ठराव क्र. १८(२) अन्वये कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.** |

**विषय क्र.५ विद्यापीठ अनुदान आयोगाने सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील काही अधिव्याख्यात्यांना नेट अर्हता शिथिल केलेबाबतची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली १२ पाने जोडली आहेत)

(टिपणीः विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.1-1/2008(PS) Meeting pt. file I, Dt. 26 March, 2010 नुसार सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३८ महाविद्यालयातील १८६ व विद्यापीठातील एक अधिव्याख्याता अशा एकूण १८७ अधिव्याख्यात्यांना नेट अर्हता शिथिल केलेबाबत कळविलेले आहे.

विद्यापीठाने परिपत्रक क्र. SOL/BCUD/DH/144, Dt. 06-04-2010 नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविलेले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.५** | **विद्यापीठ अनुदान आयोगाने संलग्नित महाविद्यालयातील काही अधिव्याख्यात्यांना नेट अर्हता शिथिल केल्याबाबतच्या कार्यवाहीची घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.६** | **प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेतर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवा शर्ती) नियम, १९८४ रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.** |

(सोबत शासन निर्णय)

(टिपणी - महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०/(३१२/२०१०)/विशि-०१, दिनांक २० मे, २०१० नूसार, प्रस्तुत विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता नियम १९८४ हे रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता नियम १९८४ हे रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत.

**सर्व विद्यापीठासाठी सामायिक परिनियम (Common Statute) तयार करुन ते लागू होईपर्यंत प्रमाण संहिता नियमाच्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात यावे असा निर्णय JBVC च्या बैठकीत घेण्यात आलेला आहे असे नमूद केलेले आहे.**

दिनांक २० मे, २०१० पासून महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता नियम १९८४ हे रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू झालेले शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.६** | **प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेतर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवा शर्ती) नियम, १९८४ रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करण्याबाबतच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.७ व्यवस्थापन परिषदेच्या दि.१०/०३/२०१० रोजीच्या सभेची विषयपत्रिका, कागदपत्रे व ठराव इ. माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. वाय. एन. कोंडा यांनी माहिती अधिकारात मागणी केल्यामुळे देण्याबाबतची बाब विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या सभेची विषयपत्रिका, कागदपत्रे व ठराव इ. बाबत परिनियम ४९० खालीलप्रमाणे आहे.

**"The agenda of the Management Council meeting its enclosures and the minutes of the meeting, thereof shall be treated as confidential."**

उक्त परिनियमान्वये व्यवस्थापन परिषदेच्या सभेची विषयपत्रिका, कागदपत्रे व ठराव इ. कागदपत्रे गोपनीय आहेत. परंतु, श्री. वाय. एन. कोंडा यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराखाली दि.१०/०३/२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी केली आहे. याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ८ (१) (e) खालीलप्रमाणे आहे.

**"ङ) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती;"**

उक्त कलमाचे अवलोकन केले असता, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या दि.१०/०३/२०१० रोजीच्या सभेच्या कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांना ही माहिती देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.७** | **अ) व्यवस्थापन परिषद सभेच्या विषयपत्रिका, कागदपत्रे व ठराव इ. माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केल्यास माहिती द्यावी असे ठरले.**<br>**ब) परिनियम ४९० स्थगित (Repeal) करण्याबाबतची विहित कार्यवाही करावी.** |

**विषय क्र.८ कला व ललित कला विद्याशाखांतर्गत पदवी / पदव्युत्तर स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance No. 11 & 12 पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत केलेले Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत Ordinance जोडलेले आहे)

**(टिपणी -** दि. १२/०६/०९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ ते १९ व ३१(१४) अन्वये सर्व विद्याशाखा अंतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचे Ordinances ला मान्यता देण्यात आलेली असून, त्यानुसार मा.कुलपती कार्यालयाकडे दि.२४जून २००९ रोजी मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहेत.

परंतू सत्र पध्दती शै. वर्ष २००९ -१० ऐवजी २०१०-११ पासून लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, दि. १०/०९/०९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील चर्चेनुसार, सर्व विद्याशाखेकडील Ordinances अधिष्ठाता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्याचे ठरले.

कला व ललित कला विद्याशाखातंर्गत सर्व अभ्यासमंडळांनी सुधारीत केलेले Ordinance अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

कला व ललित कला विद्याशाखेच्या दि.०८/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ०९ नुसार सुधारीत केलेले Ordinance विद्याशाखेने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहे.

विद्यापरिषदेच्या दि. २९/०४/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १७४ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत केलेले Ordinance (No.11 & 12) व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

कला व ललित कला विद्याशाखातंर्गत पदवी / पदव्युत्तर स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance (No.11 & 12) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.८** | **अ)** | **कला व ललित कला विद्याशाखांतर्गत पदवी / पदव्युत्तर स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No. 11 & 12) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ब)** | **सुधारीत अध्यादेश (Ordinance) संदर्भातील विहित कार्यवाही करावी.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.९** | **विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance No. 10 पुनश्च: पडताळणी करुन घेऊन, सुधारीत केलेले Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(सोबत Ordinance जोडलेले आहे)

**(टिपणी -** दि. १२/०६/०९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ ते १९ व ३१(१४) अन्वये सर्व विद्याशाखा अंतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचे Ordinances ला मान्यता देण्यात आलेली असून, त्यानुसार मा.कुलपती कार्यालयाकडे दि.२४जून २००९ रोजी मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहेत.

परंतू सत्र पध्दती शै. वर्ष २००९ -१० ऐवजी २०१०-११ पासून लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, दि. १०/०९/०९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील चर्चेनुसार, सर्व विद्याशाखेकडील Ordinances अधिष्ठाता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्याचे ठरले.

विज्ञान विद्याशाखातंर्गत सर्व अभ्यासमंडळांनी सुधारीत केलेले Ordinance अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

विज्ञान विद्याशाखेच्या दि.१०/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १६(१३) नुसार सुधारीत केलेले Ordinance विद्याशाखेने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहे.

विद्यापरिषदेच्या दि.२९/०४/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१७३ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत केलेले Ordinance (No.10) व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विज्ञान विद्याशाखातंर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance (No.10) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.९** | **विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance No. 10 पुनश्च: (Refer back) विद्यापरिषदेकडे विचारार्थ पाठवावेत.** |

**विषय क्र.१० वाणिज्य विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance No. 13 पुनश्च: पडताळणी करुन घेऊन, सुधारीत केलेले Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत Ordinance जोडलेले आहे)

**(टिपणी -** दि. १२/०६/०९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ ते १९ व ३१(१४) अन्वये सर्व विद्याशाखा अंतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचे Ordinances ला मान्यता देण्यात आलेली असून, त्यानुसार मा.कुलपती कार्यालयाकडे दि.२४जून २००९ रोजी मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहेत.

परंतू सत्र पध्दती शै. वर्ष २००९ -१० ऐवजी २०१०-११ पासून लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, दि. १०/०९/०९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील चर्चेनुसार, सर्व विद्याशाखेकडील Ordinances अधिष्ठाता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्याचे ठरले.

वाणिज्य विद्याशाखातंर्गत सर्व अभ्यासमंडळांनी सुधारीत केलेले Ordinance अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

वाणिज्य विद्याशाखेच्या दि.०९/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १० नुसार सुधारीत केलेले Ordinance विद्याशाखेने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहे.

विद्यापरिषदेच्या दि.२९/०४/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१७२ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत केलेले Ordinance (No.13) व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

वाणिज्य विद्याशाखातंर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance (No.13) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.१०** | **अ)** | **वाणिज्य विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No. 13) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ब)** | **सुधारीत अध्यादेश (Ordinance) संदर्भातील विहित कार्यवाही करावी.** |

**विषय क्र.११ सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत पदवी / पदव्युत्तर स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance No. (11 & 12) पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत केलेले Ordinance व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत Ordinance जोडलेले आहे)

**(टिपणी -** दि. १२/०६/०९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ ते १९ व ३१(१४) अन्वये सर्व विद्याशाखा अंतर्गत सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचे Ordinances ला मान्यता देण्यात आलेली असून, त्यानुसार मा.कुलपती कार्यालयाकडे दि.२४जून २००९ रोजी मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहेत.

परंतू सत्र पध्दती शै. वर्ष २००९ -१० ऐवजी २०१०-११ पासून लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, दि. १०/०९/०९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील चर्चेनुसार, सर्व विद्याशाखेकडील Ordinances अधिष्ठाता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्याचे ठरले.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखातंर्गत सर्व अभ्यासमंडळांनी सुधारीत केलेले Ordinance अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या दि.१७/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ०५ नुसार सुधारीत केलेले Ordinance विद्याशाखेने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहे.

विद्यापरिषदेच्या दि.२९/०४/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१७४ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत केलेले Ordinance (No.11 & 12) व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखातंर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Ordinance (No.11 & 12) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.११** | **अ)** | **सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत पदवी / पदव्युत्तर स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No. 11 & 12) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ब)** | **सुधारीत अध्यादेश (Ordinance) संदर्भातील विहित कार्यवाही करावी.** |

**विषय क्र.१२ जनविकास केंद्राबाबतचा विद्यापरिषदेचा ठराव क्र. ५४ विचारार्थ.**
**(सोबत विद्यापरिषदेचा ठराव जोडला आहे)**

(टिपणी: जनविकास केंद्राची नियमावली ठरविण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल विद्यापरिषदेच्या दि.२९/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठेवला असता, ठराव क्र. ५४ (अ) अन्वये समितीचा अहवाल स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.

ठराव क्र. ५४ ब अन्वये जनविकास केंद्राची अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका संलग्नीकरण नुतनीकरण फॉर्मचे शुल्क रु.५००/- आकारण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब उपरोक्त विद्यापरिषदेच्या ठराव क्र. ५४ (ब) नुसार केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१२** | **जनविकास केंद्र संचलित अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका व संलग्नीकरणाचे नुतनीकरण फॉर्मसह शुल्क रु.५००/- आकारण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१३ सोबत यु.जी.सी. नवी दिल्ली यांनी महाविद्यालयांच्या संलग्निकरणाबाबत अवलंबलेल्या नवीन नियमावलीनुसार संलग्निकरणाची कार्यवाही करण्यासाठी सदर नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव व कार्यवाहीबाबत.**

टिपणीः यु.जी.सी. नवी दिल्ली यांनी महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या संलग्निकरणाबाबत नवीन नियमावली अवलंबलेली आहे. सदर नियमावलीनुसार संलग्निकरणाची कार्यवाही करावी लागणार आहे.

सदर नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव व नियमावलीनुसार महाविद्यालयांच्या संलग्निकरणाची कार्यवाही करण्याबाबत विचारार्थ).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.१३** | **अ)** | **U.G.C. Affiliation of Colleges by Universities Regulation, 2009 नोंद घेण्यात आली.** |
| | **ब)** | **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३० (२) (m) अन्वये विद्यापरिषदेकडे पाठवावा असे ठरले.** |

**विषय क्र.१४ तक्रार निवारण समितीच्या दि.२५/०५/२०१० रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर दि.२५/०५/२०१० रोजी तक्रार निवारण समितीपुढे सुनावणी घेण्यात आली. दि.२५/०५/२०१० रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास परिनियम ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. याकरिता तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१४** | **तक्रार निवारण समितीच्या दि.२५/०५/२०१० रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारसीपैकी ठराव क्र. २ (प्रस्तुत तक्रार संस्थेच्या विरोधात असल्याने) पुनश्चः (Refer back) तक्रार निवारण समितीकडे पाठवावा. उर्वरित शिफारशी स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१५ नवीन ४८२ एकर परिसरातील उन्हाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरे व शिबिरात होणाऱ्या विविध खर्चाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.**

(टिपणी: विद्यापीठाच्या नवीन ४८२ एकरामध्ये उन्हाळी विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन दि.३०/०४/२०१० पासून करण्यात आले असून शिबिराच्या खर्चासाठी एकूण रु.१३,००,०००/- मान्य करण्यात आलेले आहेत. सबब रु.१३,००,०००/- खर्चाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे (रोज अंदाजे २५० स्वयंसेवक ६० दिवसांसाठी असे एकूण १५,००० स्वयंसेवक अपेक्षित आहेत).

| अ.क्र. | शिबिरात होणाऱ्या खर्चाचा तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | स्वयंसेवक भोजन खर्च | ६,००,०००/- |
| २) | शिबिरात येणाऱ्या स्वयंसेवकाचा प्रवास खर्च | १,००,०००/- |
| ३) | शिबिराशी संबंधित साहित्य खरेदी व दुरुस्ती | ५०,०००/- |
| ४) | व्याख्याते व मार्गदर्शक यांचा प्रवासखर्च व मानधन | ५०,०००/- |
| ५) | संकीर्ण | १,००,०००/- |
| | **एकूण** | **९,००,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे अपेक्षित खर्च रु.९,००,०००/- यास मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| **ठराव क्र.१५** | **नवीन ४८२ एकर परिसरातील उन्हाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरे व शिबिरात होणाऱ्या विविध खर्चाच्या बाबीचा उपरोक्त विषय मागे घेण्यात आला.** |
|---|---|

**विषय क्र.१६ सोलापूर विद्यापीठाचा सन २००८-०९ चा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत जोडपत्र पान क्र. १ ते ३३५ आहेत)**

टिपणी : सोलापूर विद्यापीठाचा सन २००८-०९ चा वार्षिक अहवाल तयार करण्याकरीता नियुक्त केलेल्या समितीने वार्षिक अहवाल तयार केलेला असून सोबत त्याची प्रत जोडली आहे.

सबब, सदरचा विषय महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (cc) नुसार व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. सदर विषय मान्यतेनंतर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १०४अन्वये मा.कुलपतींना पाठविणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर)

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.१६** | **अ)** | **विद्यापीठाचा सन २००८-०९ चा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ब)** | **विद्यापीठाचा (शै. वर्षासाठी) ठळक घडामोडींचा संक्षिप्त वार्षिक अहवाल (Annual Report) (इंग्रजीतून) वार्षिक अहवाल समितीने करावा असे ठरले.** |

**विषय क्र.१७ To prepare the panel of Project Management Consultant**

[Note:-The open offer were after while giving the offer in newspapers Daily Sanchar & Sakal on 18 April 2010 for the Project Management Consultant and interested firm had presented themselves in front of the University committee on 3/5/2010.The report of committee is enclosed.

Hence preparation of panel of Project Management Consultant is for consideration ]

सदरची बाब दि. ४.५.२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४२ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

**बांधकाम समिती ठराव क्र. २** **प्रोजेक्ट मॅनेजमेंट कल्सलटंट पॅनेल बनविण्याविषयी कमिटीने दिलेला अहवाल अवलोकनीय घेऊन खाली नमुद केलेल्या तीन फर्मचा प्रोजेक्ट मॅनेजमेंट कल्सलटंट म्हणून पॅनल तयार करणेची शिफारस करण्यात आली आली.**

1 **Enviro Safe Consultants Solapur**
2 **Synthesis Design & Management Consultant, Solapur**
3 **Sai Structures, Solapur**

सबब बांधकाम समितीची शिफारस परिनियम ३४२[२] नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१७** | **Recommendation of Building & Works Committee (BWC) in respect of Panel of Project Management Consultant (PMC) has been accepted and approved in addition with sr. no. 4 as enlisted below:**<br>1. **Enviro Safe Consultants Solapur**<br>2. **Synthesis Design & Management Consultant, Solapur**<br>3. **Sai Structures, Solapur**<br>4. **Shri. Rajendra Gawali. (Addition)** |

**विषय क्र.१८ Sanction for tenders-Boys Hostel Mess-I and Boys Hostel Mess-II**

[Note :- A open tender notice was published in the news paper Daily 'Lokmat and Pudhari' dated-9/4/2010.In response to the open tender four firms has submitted their tender for Boys Hostel Mess-I with estimated cost Rs. 21.50 lacs. Similarly four Firms has submitted their tender for Boys Hostel Mess-II with estimated cost of Rs.21.50 lacs. The comparative chart for the rates quoted for both the works is attached herewith.

Hence to allot the construction work of Boys Hostel Mess-I to M/s Prasad Shete, Solapur @1 % below and Construction of Boys Hostel Mess-II to M/s Devraj Construction, Solapur @ 1 % below was placed to Building and works Committee dated 04/05/2010. The resolution of Building Works Committee is as follows.

**बांधकाम समिती ठराव क्र.३** **विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतीगृह मेस भाग-१ साठी मे. प्रसाद शेटे यांचे अंदाजपत्रकिय रक्कम [रु-२१,३०,२०४/-] पेक्षा १% कमी दराने [रुपये- २१,०८,९०२/-] व मुलांचे वसतीगृह मेस भाग-२ साठी मे. देवराज कंस्ट्रकशन, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम [रु-२१,३०,२०४/-] पेक्षा १% कमी दराने [रु-२१,०८,९०२/-] मंजूर करणेची शिफारस करण्यात आली.**

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र.१८** | **Recommendation of Building & Works Committee (BWC) in respect of Construction work of Boys Hostel Mess-I and Boys Hostel Mess-II has been accepted and approved as shown below:** | | | |
|---|---|---|---|---|
| | **Nature of work** | **Estimated Cost** | **Negotiated Amount** | **Name of the firm** |
| | **Boys Hostel Mess-I** | **Rs.21,30,204/-** | **1% below Rs.21,08,902/-** | **M/s Prasad Shete** |
| | **Boys Hostel Mess-II** | **Rs.21,30,204/-** | **1% below Rs.21,08,902/-** | **M/s Devraj Construction Solapur** |

**विषय क्र.१९ १. सोलापूर विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र प्रयोगशाळेसाठी गॅस पाईपलाईन करणे**
**२. मुलांचे वसतीगृहासाठी रेक्टर निवासस्थान बांधणे.**
**३. कला व भाषा [सोशल सायन्स].पहिला मजला बांधकाम करणे**
**४. सोलापूर विद्यापीठ परिसराभोवती सुरक्षा भिंत बांधणे.**

**[सोबत तौलनिक तक्ता जोंडला आहे]**

[टिपणी : सोलापूर विद्यापीठ परिसरातील खाली नमुद केलेल्या कामाकरिता दै.पुढारी आणि दै.लोकमत मध्ये दि.३०/०४/२०१० रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा सुचनाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या निविदेनुसार कमीत कमी रक्कमेच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा मंजूर करणेत आलेल्या ठेकेदाराचे नावं | कामाची किंमत | वाटाघाटीनंतर ठरलेले दर | निविदा मजूर करण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सोलापूर विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र प्रयोगशाळेसाठी गॅस पाईपलाईन करणे | मे ग्लोब गॅस इंन्डस्ट्री, मुंबइ | ३,२४,३८६/- | २ % सुट | ३,१७,८९८/- |
| ०२ | मुलांचे वसतीगृहासाठी रेक्टर निवासस्थान बांधणे. | मे.सुहास हलकुडे, सोलापूर | १२,५६,६४७/- | १२ % कमी दराने | ११,०५,८४९/- |
| ०३ | कला व भाषा [सोशल सायन्स].पहिला मजला बांधकाम करणे | मे.कारभासे ॲन्ड सन्स, सोलापूर | ६१,१८,४१८/- | ५.१० % कमी दराने | ५८,०६,३७९/- |
| ०४ | सोलापूर विद्यापीठ परिसराभोवती सुरक्षा भिंत बांधणे.. | मे देवराज कन्स्ट्रक्शन, सोलापूर | २२,४९,२८७/- - | १३ %कमी दराने | १९,५६,८८०/- |

नजीकच्या काळात बांधकाम समितीची बैठक होणार नसल्याने व सदरच्या कामाचा कार्यारंभ आदेश देणे जरुरीचे असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४[७] बांधकाम समितीच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी सदर कामाची शिफारस केली आहे.

सबब सोलापूर विद्यापीठ परिसरातील वर नमूद केलेले चारही कामे करणे कामाच्या समोर नमूद केलेल्या ठेकेदारांना कार्यारंभ आदेश देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर].

| **ठराव क्र.१९** | **ठराव पुढील पानावर..** |
|---|---|

| ठराव क्र.१९ | **बांधकाम समितीच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालील तक्त्यात निर्दिष्ट केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अ. क्र | कामाचे नांव | निविदा मंजूर करणेत आलेल्या ठेकेदाराचे नावं | कामाची किंमत | वाटाघाटी नंतर ठरलेले दर | निविदा मजूर करण्यात आलेली रक्कम |
| | 01 | सोलापूर विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र प्रयोगशाळेसाठी गॅस पाईपलाईन करणे | मे ग्लोब गॅस इंन्डस्ट्री, मुंबई | 3,24,386/- | 2 % सुट | 3,17,898/- |
| | 02 | मुलांचे वसतीगृहासाठी रेक्टर निवासस्थान बांधणे. | मे.सुहास हलकुडे, सोलापूर | 12,56,647/- | 12 % कमी दराने | 11,05,849/- |
| | 03 | कला व भाषा [सोशल सायन्स].पहिला मजला बांधकाम करणे | मे.कारभासे ॲन्ड सन्स, सोलापूर | 61,18,418/- | 5.10 % कमी दराने | 58,06,379/- |
| | 04 | सोलापूर विद्यापीठ परिसराभोवती सुरक्षा भिंत बांधणे. | मे देवराज कन्स्ट्रक्शन, सोलापूर | 22,49,287/- | 13 %कमी दराने | 19,56,880/- |

**विषय क्र.२० दि.२८/०५/२०१० च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**
**(सोबत कार्यवृत्तांत जोडला आहे)**

टिपणी: दि.२८/०५/२०१० रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो परिनियम ३२४ नुसार वित्ता व लेखा समिती तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.०३/०६/२०१० च्या वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.२८/०५/२०१० रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.२०** | **खरेदी समितीच्या दि.२८/०५/२०१० रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्ताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे ठरावासमोर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | |
| | **ख.स. ठराव क्र. १:** | **नोंद घेण्यात आली.** |
| | **ख.स. ठराव क्र. २:** | **शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ख.स. ठराव क्र. ३:** | **शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ख.स. ठराव क्र. ४:** | **सुधारीत तौलोनिक तक्त्यातील देखभाल दर वगळता व ड्रिप दर वजा जाता रु.२,२८,६२८/- या दराने १ ते ७ प्रमाणे कामे मे. दीपू नर्सरी मंगळवेढा यांच्याकडून करुन घेण्याबाबतची वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. (सोबत सुधारीत तौलोनिक तक्ता जोडला आहे).** |
| | **ख.स. ठराव क्र.५(१):** | **शिफारस स्विकारण्यात येवून साफसफाईचे कंत्राट रामचंद्र डी. साठे सोलापूर यांना रु.१९,९००/- या दराने देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | **ख.स. ठराव क्र.५(२):** | **अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी खेळाडू, मार्गदर्शक व संघव्यवस्थापक यांना पोशाख व गणवेश खरेदी करण्याबाबत दरकरार करण्याची वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/०६/२०१० रोजीच्या सभेतील विषय क्र. २० चर्चेअंती सुधारीत तौलोनिक तक्ता

कामाचे नाव: विद्यापीठ परिसरात झाडे लावणे / लॉन तयार करणे.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | पावती क्र. डी.डी. क्र. / दिनांक | पात्र / अपात्र | दरपत्रकातील नमूद दर | | | | वाटाघाटीनंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कामे क्र.१-७ | काम क्र. ८* | काम क्र.९** | एकूण | कामे क्र.१-८ | कामे क्र.१-७ |
| १) | मे. सविता नर्सरी, मंगळवेढा, जि. सोलापूर | २१८३ दि.१२/०४/२०१० | पात्र | २,६४,१२०/- | १,६९,६५०/- | ३,५०,०००/- | ७,८३,७७०/- | ४,२५,०००/- | २,५५,७०३/- |
| २) | मे. शिव नर्सरी, सोलापूर | २१८१ दि.१२/०४/२०१० | पात्र | २,७४,५४०/- | १,७५,५००/- | ३,५०,५९०/- | ८,००,६३०/- | ४,५०,०४०/- | २,७०,७६८/- |
| ३) | मे. दीपू नर्सरी, मंगळवेढा, जि. सोलापूर | २१८२ दि.१२/०४/२०१० | पात्र | २,४७,४००/- | १,६३,८००/- | ३,४०,०००/- | ७,५१,२००/- | ३,८०,०००/- | **२,२८,६२८/-** |

**कामाचा तपशील**

१. २.५ व ३ फूट उंच एक्झोरा रोपांचा पुरवठा आणि लागवड करणे
२. ४ फूट उंच व ३ ते ४ फूट असलेला अरेका पान रोपांचा पुरवठा आणि लागवड करणे.
३. कोरिया कारपेट लॉन ६" x ६" अंतरावर लावणे
४. अँटी टरमाईट ट्रीटमेंट (वाळवी प्रतिबंधक योजना) १. क्लोर पायरीफॉस (लागवडीचे वेळेस)
५. फोरेट टाकणे अंदाजे ४० kg (लागवडीचे वेळेस)
६. कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी मातीत मिसळणे १ चौ.मी. १ पाटी / घमेले
७. रासायनिक खते १.१८:४६:डी.ए.पी. २.२०:२०:० ३.१०:२६:२६:
८. * ठिबक व तुषार सिंचन दर आय.एस.आय. प्रमाणित* (विद्यापीठ बोअरवेल पासून पुढे काम करावयाचे आहे).

** रोपांची व लॉनची हिरवळ देखभाल मजूरी सह दर

टिप : खालील कामाचा समावेश आहे.

अ) पाणी देणे ब) रासायनिक खतांचा पुरवठा करणे क) वाळवी प्रतिबंधक योजना करणे ड) फोरेट टाकणे इ) खुरपणे तणांचा नाश करणे फ) मेलेले रोपे लावणे (तुटाळ / नांगे भरणे) ग) वनस्पती संरक्षण (रोगनाशक व किटकनाशक औषधांची फवारणी करणे इ).

(विद्यापीठामार्फत बोअरवेलवर योग्य त्या कॅपॅसिटीची मोटार बसविण्यात येईल).

**विषय क्र.२१ सन २००७-०८ व २००८-०९ चा लेखापरीक्षण अहवाल व कार्यपूर्ती अहवाल विचारार्थ.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

टिपणी : सोलापूर विद्यापीठाचा सन २००७-०८ व २००८-०९ चा लेखापरीक्षण अहवाल, विद्यापीठाचे अंतर्गत लेखापरीक्षक श्री. सी. आर. दोशी यांनी कार्यालयास सादर केलेला आहे. सदरचा लेखापरीक्षण अहवाल सोबत जोडलेला आहे.

तो महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (छ) (४) नुसार वित्त व लेखा समितीच्या शिफारशीसाठी सादर करण्यात आला असता, त्यास दि.०३/०६/२०१० च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेसाठी मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब सन २००७-०८ व २००८-०९ चा लेखापरीक्षण अहवाल व कार्यपूर्ती अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२१** | **सन २००७-०८ व २००८-०९ च्या लेखापरीक्षण व कार्यपूर्ती अहवालाबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.२२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६ (२) (ड) अन्वये विद्यापीठातील पदार्थविज्ञान संकुलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर विद्यापरिषदेने सोबतच्या नामिकेमधून तीन तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

**(सोबत विषय तज्ञांची यादी)**

टिपणी : विद्यापीठाने पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल, संगणकशास्त्र संकुलातील विविध शिक्षकपदे भरण्यासाठी दिनांक ०८/०३/२०१० रोजी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यामध्ये प्रत्येक पदासाठी विषय विशेषत: दर्शविली आहे. दि.२१ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. ०८ अन्वये इतर संकुलातील शिक्षक निवडी संदर्भातील तज्ञांच्या नावास मान्यता आहे. तथापि, पदार्थविज्ञान संकुलातील सहयोगी प्राध्यापकाचे एक पद रिक्त झाल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ७६ (२) (ड) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असलेल त्याविषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे. अशा विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या किमान तीन व्यक्ती.

उक्त तरतूदीन्वये विद्यापरिषदेने सोबतच्या यादीतील तज्ञांची नामिका शिफारस केली आहे. तद्वतच सदरची नामिका ही संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष, विभागप्रमुख व अधिष्ठाता यांनी तयार करुन दि.२९ एप्रिल, २०१० अन्वये विद्यापरिषदेच्या शिफारशीनुसार सोबतच्या नामिकेतून तीन तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव क्र.२२ | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६ (२) (ड) अन्वये विद्यापीठातील पदार्थविज्ञान संकुलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर विद्यापरिषदेने सोबतच्या नामिकेमधून तीन तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची शिफारस स्विकारण्यात येवून सोबतच्या नामिकेतील निवड समिती सदस्य निवडीचे अधिकार मा.कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.** |

# Solapur University, Solapur

## Physics

| Sr. No. | Name of the Experts | Address of the Expert |
|---|---|---|
| 01 | Prof. Dr. P. R. Sarode | Professor of Physics<br>Department of Physics<br>Goa University,<br>Goa. |
| 02 | Prof. Dr. A. K. Shriwastav | Professor of Physics<br>Department of Physics<br>Jiwaji University,<br>Gawliyar. |
| 03 | Prof. Dr. C. B. Dharmadhikari | Professor of Physics<br>Department of Physics<br>Pune University, Ganeshkhind,<br>Pune |
| 04 | Prof. Dr. C. Rangnathaya | Professor of Physics<br>Department of Physics<br>Mysore University,<br>Mysore. |
| 05 | Prof. Dr. P. P. Patil | Professor of Physics<br>Department of Physics<br>North Maharashtra University,<br>Jalgaon (M.S.) |
| 06 | Prof. Dr. Pawar | Department of Physics<br>Sant Gadgebaba Amravati<br>University,<br>Amaravati (M.S.) |
| 07 | Prof. Dr. Khairnar | Professor of Physics<br>School of Physical Sciences,<br>Swami Ramanand Teerth<br>Marathwada University<br>Nanded 431 606 (M.S.) |

**विषय क्र.२३ विद्यापीठामध्ये प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करणेबाबतची विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ .....**

टिपणी:विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयामध्ये विज्ञान विद्याशाखातंर्गत काही विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम नसल्यामुळे त्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर प्रयोगशाळा अभ्यासक्रम सुरु करता येत नाही.

ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम नाही पण मार्गदर्शक उपलब्ध आहेत अशा महाविद्यालयातील खालील विषयांचे पदव्युत्तर प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करणेचे आहे. यासंदर्भात दिनांक २९-४-१० रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये विषय ठेवला असता खालीलप्रमाणें ठराव पारीत केलेला आहे.

**"विद्यापीठामध्ये प्रयोगशाळा/ संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे."**

विज्ञान विद्याशाखेतंर्गत येणारे विषय

१.वनस्पतीशास्त्र २.पदार्थविज्ञान ३.रसायनशास्त्र ४.भूशास्त्र

वरील विषयासाठी संशोधन केंद्र/पदव्युत्तर प्रयोगशाळा विद्यापीठात स्थापन करण्यास विद्यापरीषदेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे. त्यामुळे संशोधन केंद्र/पदव्युत्तर प्रयोगशाळा विद्यापीठात स्थापन करण्याबाबत व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२३** | **विद्यापीठामध्ये प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.२४** | **सहावा वेतन संरचनेच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्याच्या (Transport Allowance) दरात सुधारणा करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.** |

(सोबत शासन निर्णय)

(टिपणी: महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र. वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५, दिनांक ०५ एप्रिल, २०१० नुसार, सहवा वेतन संरचनेच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या दरात सुधारणा केलेली आहे.

केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी अन्वये सर्व पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चापोटी भरपाई म्हणून वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर केला आहे.

या अनुषंगाने उक्त शासन निर्णयात पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे **"राज्य शासकीय व इतर सर्व पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वाहतूक भत्त्यात सुधारणा केलेली आहे व हे आदेश दिनांक ०१ एप्रिल, २०१० पासून अंमलात येतील".**

प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे वाहतूक भत्ता ०१ एप्रिल, २०१० पासून आदा करण्याबाबतचा शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२४** | **सहावा वेतन संरचनेच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्याच्या (Transport Allowance) दरात सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.** |

**<u>मा.कुलगुरु यांच्या परवानगीचे येणारे आयत्या वेळेचे विषय :</u>**

**[विषय क्र.२५(१)] आविष्कार २००९ महोत्सव जमा-खर्चाच्या लेखापरीक्षणाचा अहवाल.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठामध्ये आविष्कार - २००९ महोत्सव ११ ते १३ जानेवारी २०१० या कालावधीमध्ये संपन्न झाला. आविष्कार महोत्सवासाठी झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण विद्यापीठाचे सनदी लेखापाल श्री. सी. आर. दोशी ॲन्ड कंपनी यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. सोबत लेखापरीक्षणाचा अहवाल जोडला आहे.

सदरचा अहवाल मा.राज्यपाल कार्यालय यांनी नियुक्त केलेल्या वित्तीय व्यवस्थापन उपसमितीच्या दि.१०/०४/२०१० रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला असता सदर समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. सोबत बैठकीचा कार्यवृत्तांत जोडला आहे.

सबब सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(१)** | **आविष्कार २००९ वित्तीय व्यवस्थापन समितीचा आविष्कार २००९ महोत्सवासाठी जमा-खर्चाचा लेखापरीक्षण अहवाल स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **[विषय क्र.२५(२)]** | **शै. वर्ष २०१०-११ पासून सोलापूर विद्यापीठात बी. एफ. ए. (बॅचलर ऑफ फाईन आर्टस्) टेक्सटाईल डिझाईन हा चार वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(टिपणीः शै. वर्ष २०१०-११ पासून सोलापूर विद्यापीठात बी. एफ. ए. (बॅचलर ऑफ फाईन आर्टस्) टेक्सटाईल डिझाईन हा चार वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करावयाचा आहे. सदर अभ्यासक्रम स्वावलंबी तत्वावर (Self Supporting Basis) विद्यापीठ अभ्यासक्रम असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८ (२) (b) व २८ (b) याचा एकत्रित विचार करुन विद्यापीठामध्ये सदर कोर्स सुरु करता येईल.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी उपरोक्त अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यास विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सदरचा अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठात शै. वर्ष २०१०-११ पासून सुरु करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे. सबब शै. वर्ष २०१०-११ पासून सोलापूर विद्यापीठात बी. एफ. ए. (बॅचलर ऑफ फाईन आर्टस्) टेक्सटाईल डिझाईन हा चार वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(२)** | **बी. एफ. ए. (बॅचलर ऑफ फाईन आर्टस्) टेक्सटाईल डिझाईन हा चार वर्षाचा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१०-११ पासून विद्यापीठ प्रांगणात सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**[विषय क्र.२५(३)]** **बी.एफ.ए. अभ्यासक्रमाचे शुल्क व्यवस्थापन परीषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

**(एकुण २ पाने सोबत जोडली आहेत)**

(टिपणी : विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने समिती गठित केली आहे.

विद्यापीठामध्ये शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून नव्याने बी.एफ.ए. हा अभ्यासक्रम सुरु होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी शुल्क समितीने शिफारस केलेले शुल्क सोबत जोडले आहे.

सदरचे शुल्क हे सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करावयाचे असून यास मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिली आहे.

बी.एफ.ए. अभ्यासक्रमाचे शुल्क व्यवस्थापन परीषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

| **ठराव क्र.२५(३)** | **बी. एफ. ए. अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची शिफारस स्विकारण्यात येवून वार्षिक शुल्क रु.३९,१४५/- (दोन्ही सत्र मिळून) खालीलप्रमाणे आकारण्यास मान्यता देण्यात आली.** | | |
|---|---|---|---|
| | Sr. No. | Items | Amount |
| | 1) | Admission fee | 50 |
| | 2) | Registration fee | 50 |
| | 3) | Library fee | 500 |
| | 4) | Library Deposit Refundable | 200 |
| | 5) | Laboratory fee | 3000 |
| | 6) | Laboratory Deposit Refundable | 500 |
| | 7) | Gymkhana fee | 120 |
| | 8) | Tuition fees | 34000 |
| | 9) | Youth Festival | 20 |
| | 10) | Ashwamedh fee | 30 |
| | 11) | Student Insurance | 15 |
| | 12) | E-Suvidha | 50 |
| | 13) | Prorata | 40 |
| | 14) | Univesity Development fund | 50 |
| | 15) | Sutdents Aids Fund | 10 |
| | 16) | Apatkalin Nidhi | 10 |
| | 17) | Internet fee | 500 |
| | | **TOTAL** | **39145** |

**[विषय क्र.२५(४)]** **मा.कुलगुरुसो यांनी पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या शुल्काबाबत केलेली कार्यवाही व्यवस्थापन परीषदेच्या माहितीसाठी सादर.**

(टिपणी **:** पीएच.डी. प्रवेशपरीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रु.१०००/- व सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रु.७००/- इतके शुल्क आकारण्यास मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

नजीकच्या काळात व्यवस्थापन परीषद सभा लवकर होणार नसल्याने व्यवस्थापन परीषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी वरील शुल्क व्यवस्थापन परीषदेच्या वतीने मान्य केलेले आहे.

मा.कुलगुरुसो यांनी व्यवस्थापन परीषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(४)** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[विषय क्र.२५(५)] भविष्यात सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण शुल्क व्यवस्थापन परीषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

**(एकुण ३ पाने सोबत जोडली आहेत)**

(टिपणी **:** विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने समिती गठित केली आहे.

भविष्यात सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमासाठी संलग्नीकरण शुल्क समितीने सोबत जोडलेल्या तक्ताप्रमाणे शिफारस केलेली आहे.

सदर बाबत मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने सदरच्या शुल्कास मान्यता दिली आहे

सदरचे शुल्क व्यवस्थापन परीषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(५)** | **भविष्यात सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण शुल्क आकारण्याबाबत शुल्क समितीची शिफारस विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची शिफारस स्विकारण्यात येवून सोबतच्या तक्त्यात अभ्यासक्रमासमोर दर्शविल्याप्रमाणे शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.** |

# आगामी काळात सुरु होणा-या अभ्यासक्रमांसाठी संलग्नीकरण शुल्क समितीने सुचविलेले शुल्क

| Sr. No. | Faculty | Degree | College / Courses Proposed | New Affiliation fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation fee Rs. | Permanent affiliation fees Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | Fine Art | B.A. (Music ) | College of Music | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000 /- | 500/- per subject | 15,000/- |
| 2) | Fine Art | B.F.A | College of Fine Arts | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000 /- | 500 /- per subject | 15,000/- |
| 3) | | | P.G. Diploma Courses | 25,000/- | --- | --- | --- | Rs.25,000/- | 10,000/- | 25,000/- |
| 4) | | B.A. (Spiritual Study) | College of Spiritual Study | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500/- per subject | 15,000/- |
| 5) | Science | B.Sc. | B.Sc. Food Processing | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500/- per subject | 15,000/- |
| 6) | Social Sciences | B.J.M.C | B.J.M.C | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500/- per subject | 15,000/- |

| Sr. No. | Faculty | Degree | College / Courses Proposed | New Affiliation fee Rs. | New Subject Fee Rs. | Natural Extension Fee Rs. | Additional Division Fee Rs. | New Course Fee Rs. | Continuation of Affiliation fee Rs. | Permanent affiliation fees Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7) | Social Sciences | B.Lib , M.Lib, ISC | B.Lib , M.Lib, ISC | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500/- per subject | 15,000/- |
| 8) | Science | B.Sc. | B.Sc. Industrial Chemistry | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000/- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500/- per subject | 15,000/- |
| 9) | Science / Engg | B. Text | Bachelor of Textile | 50,000/- | ---- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 10) | Pharmacy | M. Pharma | M.Pharmacy | 50,000 /- | ----- | 15,000/- | 15000/- | 50,000/- | 15,000/- | 50,000/- |
| 11) | Science | M.Sc. Bio- Tech | M.Sc. Bio-Technology | 50,000/- | --- | 15,000/- | 15,000/- | 20,000 /- | 50,000/- | 50,000/- |
| 12) | Engineering | B Tech | B.Tech College | 200000/- | 25,000/- Per Branch | 25,000 /- | 25,000/- | 20,000/- | 2,00,000/- | 2,00,000/- |
| 13) | Science | B.Sc. (Home Science) | College of Home Science | 15,000 /- | 1,000/- Per Subject | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | 2000 /- up to 5 Subject & Each additional Subject Rs.500/- | Rs.15,000/- | 500 /- per subject | 15,000/- |
| 14) | Commerce | B.HMTC | College of Hotel Management & Catering Technology | 50,000/- | --- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |
| 15) | Commerce | MFM | Master of Financial Management | 50,000/- | --- | 20,000/- | 20,000/- | 50,000/- | 20,000/- | 50,000/- |

**[विषय क्र.२५(६)]** **मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावरील (CAP) संचालक व समन्वयक (Director & Co-ordinator) यांचे सुधारीत मानधन (Revised Remuneration) बाबत मा.कुलगुरु यांनी परीक्षा मंडळाच्या वतीने ३२ (४) अन्वये देण्यात आलेली मान्यता माहितीस्तव सादर.**

**(सोबत मान्यता जोडलेली आहे)**

(टिपणी: विद्यापीठाच्या मागील वर्षापासून परीक्षक / नियामक यांच्या मानधनामध्ये १० टक्के वाढ रु.१८०/- वरुन रु.२००/- करण्यात आलेली आहे. तथापि सदरची वाढ परीक्षक / नियामक चे कामाच्या तुलनेत त्यांना अपुरी आहे असे वाटते. तेव्हा मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालक आणि समन्वयक यांना देण्यात येणारे दररोज रु.३००/- जास्तीत जास्त १२,०००/- मानधनामध्ये वाढ करण्याच्या मागणीस मा.कुलगुरुमहोदयांनी परीक्षा मंडळाच्या वतीने मान्यता दिली आहे.

तसेच मध्यवर्ती मूल्यमापनाच्या कालावधीमध्ये संलग्नित महाविद्यालयांमध्ये उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज चालू आहे. CAP च्या कालावधीमध्ये संलग्नित महाविद्यालयामध्ये लाईट, पाणी, फोन बिल, (Maintenance) इ. खर्चाचा पडणाऱ्या बोजाचा विचार करता मा.कुलगुरु यांनी दररोज रु.१२५/- जास्तीत जास्त रु.५,०००/- मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास देण्यास मा.कुलगुरु यांनी परीक्षा मंडळाच्या वतीने मान्यता दिली आहे.

सबब मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालक आणि समन्वयक यांच्या मानधनाची बाब व मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास देण्यात येणाऱ्या खर्चाची बाब विचारार्थ).

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **ठराव क्र.२५(६)** | **मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावरील (CAP) संचालक व समन्वयक (Director & Co-ordinator) यांचे सुधारीत मानधन (Revised Remuneration) बाबत मा.कुलगुरु यांनी परीक्षा मंडळाच्या वतीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | | | |
| | **अ.क्र.** | **मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रातील पद** | **मानधन (प्रति दिन)** | **अंतिम मर्यादा (सिलिंग)** |
| | **१)** | **संचालक** | **रु.४००/-** | **रु.१५,०००/-** |
| | **२)** | **समन्वयक** | **रु.४००/-** | **रु.१५,०००/-** |
| | **मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र असणाऱ्या संलग्नित महाविद्यालयास पाणी, वीज, दूरध्वनी देयक व संकीर्ण खर्चापोटी रु.१२५/- प्रति दिन अंतिम मर्यादा (सिलिंग) रु.५,०००/- पर्यंत आदा करण्यास मान्यता देण्यात आली.** | | | |

**[विषय क्र.२५(७)]** **परीक्षा विभागाकडील सन २००६ पासून कार्यरत असलेले मे. कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांचे सॉफ्टवेअर कराराची मुदत दि.३०/०९/२००९ रोजी संपलेली असल्याने वार्षिक देखभाल करार (AMC) करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत कराराचा मसूदा जोडला आहे)**

(टिपणी: परीक्षा विभागाकडे सन २००६ पासून कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर या कंपनीची संगणक प्रणाली (Software) कार्यरत असून, सदर कंपनीबरोबरचा करार दि.३०/०९/२००९ परीक्षेपर्यंतचा झालेला मुदत संपली आहे. गत चार वर्षात ही संगणकप्रणाली कार्य करीत असून यामधून येणारे निकालही बहुतांश अचूक लागताहेत. विद्यापीठाने वेळोवेळी कळविल्यानंतर कंपनीने त्यांचे कर्मचारी पाठवून प्रणालीमधील येणाऱ्या त्रुटी दूर केल्या आहेत व विद्यापीठाने सुचविल्याप्रमाणे प्रणाली user friendly केली आहे. सध्या कोअर सॉफ्टवेअर प्रणालीत काही अभ्यासक्रमाचे पूर्णत: व काहीचे अंशत: Result Processing होत आहे. मागील वर्षी सदर कंपनीने रु.१,००,०००/- ची इरादापत्र (Indent letter) दिले होते, परंतू त्यांना वार्षिक देखभाल करारासाठी रु.८०,०००/- + New Development साठी रु.२०,०००/- असे एकूण रु.१,००,०००/- रक्कमेचा करार केला होता. New Development पैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असून काही बाबीच्या त्रुटी दूर करण्यात येत आहेत.

सदर संगणक प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास, तसेच अभ्यासक्रमामध्ये, नियमांमध्ये, अभ्यासक्रम आराखड्यामध्ये बदल झाल्यास सदर बदलाप्रमाणे प्रणालीमध्येही बदल करुन घेणे आवश्यक असते. उदा. अभियांत्रिकी अभ्यासक्रम बदलल्यामुळे नियमाप्रमाणे Equivalence लावून देण्याची व्यवस्था इ. सध्या विभागाकडे संगणक प्रणाली साठी Programmer अथवा Expert या पदावर कर्मचारी कार्यरत नाहीत. तसेच CAP, व Strong Room साठी कार्यरत असलेले Software साठी देखभाल व वेळोवेळी अद्यावत आवश्यक असते. इ. साठी सदर Software कंपनीबरोबर वार्षिक देखभाल करार (AMC) करणे आवश्यक आहे, असे वाटते. **हा देखभाल करार दि.१/४/२०१० ते दि.३१/३/२०११ करणे असा प्रस्तावित करण्यात येत आहे.**

उपरोक्त (AMC) साठी CISPL दि.२५/०१/२०१० रोजी प्रस्ताव दिलेला आहे. प्रस्तावानुसार त्यांनी **रु.१,२५,०००/-** ची मागणी केली आहे. सबब वार्षिक देखभाल करार करणेबाबत विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव क्र.२५(७) | **मे. कोअर इन्फो सोल्यूशन प्रा. लि. कोल्हापूर यांच्यामसवेत दि.०१/०४/२०१० ते दि.३१/०३/२०११ या मुदतीकरिता रु.१,२५,०००/- याप्रमाणे सॉफ्टवेअर वार्षिक देखभाल करार (AMC) करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**[विषय क्र.२५(८)] विद्यापीठ विकास निधीच्या खर्चाचा आराखडा (Action Plan) करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेला आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत आराखडा जोडला आहे)**

(टिपणी: सर्व संलग्नित महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रु.५०/- प्रमाणे विद्यापीठ विकास निधी जमा होतो. जमा झालेल्या विद्यापीठ विकास निधीचा वापर करण्यासाठी आराखडा (Action Plan) करणेकामी खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

**१. प्रा. एन. बी. पवार (अध्यक्ष)**

**२. प्रा. एन. आर. गरड (सदस्य)**

**३. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर (सदस्य)**

सदर समितीची बैठक दि.१६/०६/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये जमा झालेल्या विद्यापीठ विकास निधीचा विद्यापीठ व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वापर करणेकामी सोबत जोडल्याप्रमाणे आराखडा (Action Plan) केलेला आहे.

सबब उपरोक्त समितीने केलेला आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(८)** | **विद्यापीठ विकास निधीच्या खर्चाचा आराखडा (Action Plan) संदर्भात नियुक्त समितीच्या शिफारशी स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**[विषय क्र.२५(९)]** **विद्यापीठ अनुदान आयोगाने सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील काही अधिव्याख्यात्यांना शिथिल केलेली नेट अर्हता काढून घेतलेबाबतची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

**(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०२ पाने जोडली आहेत)**

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.1-1/2002(PS)Exemp. Pt. File IV, Dt. 03 JUN. 2010 नुसार सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३८ महाविद्यालयातील १८६ व विद्यापीठाती एक अधिव्याख्याता अशा एकूण १८७ अधिव्याख्यात्यांना शिथिल केलेली नेट अर्हता काढून घेतलेबाबत कळविलेले आहे.

विद्यापीठाने परिपत्रक क्र. SOL/UTY/AS/528 Dt. 10/06/2010 नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना संकेतस्थळाद्वारे कळविलेले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(९)** | **विद्यापीठ अनुदान आयोगाने सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील काही अधिव्याख्यात्यांना शिथिल केलेली नेट अर्हता काढून घेतल्याच्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[विषय क्र.२५(१०)] विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगाव सोलापूर यांना देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगाव सोलापूर यांचे पत्र)

(टिपणीः विनाखंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरबाबतची पार्श्र्वभूमी खालील प्रमाणे आहे.

०१ सोलापूर विद्यापीठ, सोलापूर महानगरपालिका, दुध पंढरी आणि इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय या चौघांमध्ये एक्सप्रेस फीडर घेण्याचे ठरले होते.

०२ याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५/०७/२००६ रोजी आयत्या वेळेचा विषय क्र-१२ अन्वये सादर करण्यात आला होता.

०३ यावरील ठरावानुसार सोलापूर महानगरपालिका व इंदिरा गांधी अभियांर्त्रिकी महाविद्यालय यांनी एक्सप्रेस फीडर घेण्याकरिता नकार दिला.

०४ त्यामुळे दूध पंढरी व सोलापूर विद्यापीठ यांची संयुक्तपणे एक्सप्रेस फीडर घेतला व यानुसार एक्सप्रेस फीडरपोटी येणा-या एकूण खर्चापैकी रु-१२,८३,६५०/- [एकूण रक्कमेच्या ५० टक्के रक्कम ] इतकी रक्कम विद्यापीठाने स्वतःचा हिस्सा म्हणून दि.४ जानेवारी २००७ रोजी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरलेली आहे.

०५ सोलापूर महानगरपालिकेचा पुणे नाका येथील जकात नाका कैंगांव येथे असल्याने त्याचा ग्रामीण हद्दीत समावेश होतो. ग्रामीण विभागात सध्या १२-१२ तास विद्युत भारनियमन होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर विद्यापीठाकडील असणा-या एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शनची मागणी केलेली होती. याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि ३० मार्च,२००९ च्या बैठकीत विषय क्र-१२ अन्वये ठराव खालील प्रमाणे झाला आहे.

सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या सोलापूर विद्यापीठासमोरील जकात नाका येथे विना खंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याच्या प्रस्तावास खालील अटीच्या आधीन राहून मान्यता देण्यात आली.

०१. एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकण खर्च रु-२५,८६,७५०/- पैकी १/३ रक्कम सोलापूर महानगपालिकेने विद्यापीठ आणि दुध पंढरी यांच्यांकडे जमा करावी

ठराव क्र १ नुसार विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र.एसओएल/१४००,दि.५.६.२००९ अन्वये मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांना कळविले आहे. परंतु त्याबाबत त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली येत नाही.

**उर्वरित विषय पुढील पानावर..२..**

**उर्वरित विषय मागील पानावरुन .. २..**

त्यानंतर सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांनी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन द्यावी अशी विनंती केली होती. एक्सप्रेस फीडरपाटी आलेल्या खर्चापैकी १/३ किंवा ५० टक्के रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती. सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक -२१.११.२००९ च्या बैठकीत विषय क्र.१८ अन्वये ठराव खालीलप्रमाणे झाला आहे.

विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांना खालील अटीस राहून मान्यता देण्यात आली.

०१) एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकूण खर्च रुपये-२५,८६,७५०/- पैकी ५० टक्के रक्कम व्याजासह सोलापूर विद्यापीठ व दूधपंढरी यांना आदा करावी.

ठराव क्र १ नुसार विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र.एसओएल/ ५७९१,दि.२४.१२.२००९ अन्वये मा. व्यवस्थापकीय संचालक, दुध पंढरी, सोलापूर यांना याप्रकरणी मागणी संस्थेस एक्सप्रेस लाईन वरुन विद्युत कनेक्शन देणे बाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता. त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगांव यांनीही त्यांचे कार्यालयीन पत्र दिनांक-२१.१२.२००९ अन्वये दुध पंढरी कार्यालयास नाहरकत पत्र मिळण्याबाबत विनंती केली होती. परंतु याप्रकरणी दुधपंढरी, सोलापूर यांनी काहीही कळविले नाही.

आत्ता प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केंगाव, सोलापूर यांनी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन द्यावी अशी विनंती केली आहे. एक्सप्रेस फीडरपोटी आवश्यक असलेली कोटेशनची रक्कम भरणा करण्याची तयारी दर्शविली आहे.

त्यामुळे सोलापूर महानगरपालिका व दुधपंढरी यांच्याकडून कसल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने यापुर्वी दिलेल्या दोन्ही मान्यता रद्द करुन प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केंगाव, सोलापूर याच्या विनंतीनुसार सोलापूर विद्यापीठाकडील एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर ]

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.२५(१०)** | **अ)** | **सोलापूर महानगरपालिका व सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांना यापूर्वी दिलेली मान्यता रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | **ब)** | **एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन मिळण्याबाबत भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगाव सोलापूर यांना खालील अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आली.**<br>**१) एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या खर्चापोटी एकूण रु.२५,८६,७५०/- पैकी ५०टक्के रक्कम रु.१२,९३,३७५/- व्याजासह विद्यापीठ व दूधपंढरी यांना सहा महिन्याच्या आत आदा करावी. विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास मान्यता आपोआप संपुष्टात येईल असे ठरले.** |

**[विषय क्र.२५(११)] सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेस विद्यापीठ परिसरात ए.टी.एम. सेवा सुरु करण्याची बाब विचारार्थ.**

**(सोबत बँकेचे पत्र जोडले आहे)**

(टिपणीः दै. सकाळ मधील विद्यापीठामध्ये बँकेची शाखा उघडण्यासंबंधी आलेल्या बातमीच्या अनुषंगाने सेंट्रल बँकेच्या कोंडी शाखा यांनी **विद्यापीठासाठी व विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी ATM ची सुविधा, इंटरनेट बँकिंगची सुविधा, कर्जाची सुविधा व इतर सेवा** पुरविण्याची तयारी दर्शविली. त्या अनुषंगाने हा विषय दि.२१/११/२००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र. ०५ अन्वये सादर केला असता, त्यावरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या दि.०७/१०/२००९ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली.**

पुनश्चः दि.१०/०६/२०१० रोजीच्या पत्रान्वये सेंट्रल बँक ऑफ इंडिया कोंडी शाखा यांनी विद्यापीठ परिसरात ए. टी. एम. सुविधा देण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(११)** | **सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेस विद्यापीठ परिसरात ए.टी.एम. सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |

**[विषय क्र.२५(१२)] द गॅझेट ऑफ इंडिया, नुसार एम.फिल. व पीएच.डी. नियमावलीमध्ये दुरुस्ती करणेबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी : द गॅझेट ऑफ इंडिया दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of Ph.D. regulation, २००९ नुसार एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीची सुधारीत नियमावली तयार करण्यासाठी दिनांक ३० मार्च २०१० च्या व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्यता मिळालेली आहे.

तथापि त्यानियमाप्रमाणे प्रवेशपरीक्षा घेताना व पुढील प्रक्रिया करताना विद्यार्थी, मार्गदर्शक इत्यांदीकडून काही सूचना प्राप्त झाल्या आहेत तसेच काही त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत सबब सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५(१२)** | **द गॅझेट ऑफ इंडिया, नुसार एम. फिल. व पीएच.डी. पुढील प्रवेशप्रक्रियेसाठी नियमावली दुरुस्त करण्यास्तव खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**<br>**१) प्रा. एन. बी. पवार - सदस्य**<br>**२) प्रा. बी. पी. रोंगे - सदस्य**<br>**३) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य**<br>**४) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य**<br>**५) श्रीमती एन. व्ही. साठे - सदस्या**<br>**६) प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे - सदस्य**<br>**पुढील प्रवेश प्रक्रियेपूर्वी उक्त समितीने नियमावली तयार करुन विद्यापीठ प्रशासनाकडे सादर करावी असे ठरले.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**